

शैक्षणिक
चिंतन
डॉ. वसुधा वि. देव

डी.एड., बी.एड., एम.एड. महाविद्यालये, शालेय शिक्षण विभाग, विद्यापीठ संशोधन केंद्रे, शिक्षा संशोधनार्थी तसेच विविध शिक्षणाधिकारी यांना उपयुक्त पुस्तक

# शैक्षणिक चिंतन


डॉ. वसुधा वि. देव

अधिव्याख्याता

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला



विद्या बुक्स
VIDYA BOOKS
NAGPUR

- शैक्षणिक चिंतन
- Shaikshanik Chintan


- ©
  डॉ. वसुधा वि. देव
- Dr. Vasudha V. Deo


- प्रकाशक
  विनोद लोकरे
  विसा बुक्स
  'स्वागत', ५५ डागा ले आऊट,
  उत्तर अंबाझरी मार्ग,
  नागपूर-४४० ०३३
  फोन (०७१२) २२३४८२१
- ISBN : 81-903849-7-x
- आवृत्ती पहिली : २००७
- अक्षर जुळवणी
  *मुद्रा*,
  राम कुळकर्णी
  नागपूर
- मुद्रक
  रवि ऑफसेट,
  नागपूर

चिन्मय-पुरुषोत्तम चरणी .......

ॐ सर्वाधारं सर्व बुद्धीप्रकाशं । सर्वाकारं चिन्मय प्रेमस्वरूपम्
नित्यं शुद्धं निश्चलम् निर्विकारं । पूर्णात्मानं सद्गुरूं तं नमामि ।

माझ्या जीवनात निखळ आनंद निर्माण करणारा व मला माझ्या अंतिम ध्येयाची जाणीव करून देणाऱ्या माझ्या 'चिन्मयास' व माझ्या जीवनाचे अधिष्ठान असणारे माझे सद्गुरू प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती यांचे चरणी .....

## मनोगत

भारतीय संस्कृती परंपरा ही अतिशय उज्ज्वल व प्राचीन आहे. ह्या संस्कृतीवर आजवर अनेक आघात झाले. त्यातील काही आघात संस्कृतीने पचवले तर काही आघात हे परतवून लावले. आजही भारतीय संस्कृती आपले स्थान विश्वामध्ये राखून आहे. कारण तिचे तत्त्व, मूल्य हे चिरंतन आहे. पण २१ व्या शतकात ह्या मूल्यांवर कोठे आघात तर बसत नाही ना, अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. आज सर्वत्र ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. मानवाने ज्ञानाची उत्तुंग भरारी मारली आहे. विज्ञानाचे युग तर केव्हाच मागे पडले. संगणकाचे युगही मागे पडत आहे. त्याची जागा तंत्रज्ञान युगाने घेतली आहे. इहवादाच्या व भौतिक वादाच्या मागे जग झपाट्याने चालले आहे. जगाच्या या शर्यतीत आता आम्हीही उतरलो आहोत. ह्या स्पर्धेत येत असताना आपण भारतीयत्व तर गमावणार नाही ना, ही बोचणी वारंवार मनाला लागून राहते. कारण जागतिकीकरणाच्या ह्या काळात आज अनेक समस्यांना मानवाला सामोरे जावे लागत आहे. अवकाशात आपले अस्तित्व सिद्ध करणारा मानव चारित्र्याच्या बाबतीत मात्र पार रसातळाला जातो आहे. आमच्या संस्कृतीला जगामध्ये स्थान मिळवून देणारे जे जे घटक आहेत, त्याची नव्या संदर्भात ह्या पिढीला ओळख होणे आवश्यक आहे. हा आमच्या जीवनाचा दीपस्तंभ आहे. आज आम्ही जे शिक्षण देत आहोत त्यातून स्वदेश भक्ती व राष्ट्रभावना जागृत होते का? आपल्या राष्ट्राबद्दलचे प्रेम निर्माण होण्याऐवजी अंधश्रद्धा, अविश्वास, अप्रीती का निर्माण होत आहे? स्वधर्म, स्वदेशी तत्त्वज्ञान, स्वदेशी तंत्रज्ञान याचा अर्थ आम्ही स्वातंत्र्यात गमावून बसलो का? स्वत:च्या मातृभाषेचे आकर्षण आज माझ्या विद्यार्थ्यांच्या मनात का नाही? माझ्या देशातील अनेक बालके आजही शिक्षणापासून वंचित आहेत व ते उत्पन्न मिळविण्यासाठी कार्य करीत आहेत. अशा बालकामगारांसाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू आहेच पण त्याच्याबद्दल प्रत्येक नागरिकाच्या मनात जागृती निर्माण का होत नाही? ज्या हातांनी खेळायचे, लिहायचे त्याच हातांना आज कमाई करण्याची गरज का निर्माण होते? बालवयात मातृभाषेचे प्रेम निर्माण करण्याऐवजी, मातृभाषेचे भाषिक संस्कार पक्के करण्याऐवजी आपण इंग्रजी भाषेचा अट्टहास का करतो आहोत? बालकांना घडविणारा शिल्पकार म्हणजे शिक्षक. हा शिक्षक घडविताना आपण सर्वंकष पद्धतीने शिक्षण देत आहोत का? आज भारताचा, समाजाचा चेहरामोहराच बदलतो आहे. ह्या बदलाच्या परिस्थितीशी सामना करण्याचे, संस्कार रुजविण्याचे सामर्थ्य आम्ही शिक्षक-शिक्षणाच्या माध्यमातून करीत आहोत का? परिस्थितीशी समायोजन करण्याची पात्रता ही शिक्षकामध्ये निर्माण होते आहे का? त्यांच्या अध्यापकीय व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आहे का? पारंपरिक शिक्षक-प्रशिक्षणाच्या संदर्भात नेमक्या कोणत्या परिवर्तनाची आवश्यकता आहे? मानव स्वत:च्या

अधिकाराच्या बाबतीत जागृत आहे, पण तेवढाच तो कर्तव्याच्या बाबतीत जागृत आहे का? मानवाधिकाराचे प्रकार अनेक असले तरी मानवाचा श्रेष्ठ अधिकार हा आध्यात्मिक अधिकार आहे याची जाणीव त्याला आहे का? 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता ।' अशी आमची संस्कृती. पण ह्या संस्कृतीने स्त्रीला शापित ठरविले, अबला ठरविले. प्रत्येक काळात तिला अग्निपरीक्षाच द्यावी लागली. पण स्त्री ही खरच अबला आहे का? अबला असेल तर ती शक्तीचे रूप कशी? पण मातृशक्तीत खरी स्त्रीशक्ती दडलेली आहे हेही तितकेच खरे! स्त्री व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षणाला आता वेगळा विचार करावा लागणार आहे, हे निश्चित. हा विचार कोणता? आज भारतीय समाजरचना ढासळते आहे. मूल्यव्यवस्था ढासळते आहे. मूल्य घसरण, मूल्य संघर्ष हा आज गंभीर प्रश्न होऊ पाहतो आहे. चिरंतन, शाश्वत, सनातन जीवनमूल्यांचे उच्चाटन होत आहे की काय अशी परिस्थिती आज समाजात निर्माण झाली आहे. ह्यासाठी मूल्य शिक्षणाचीही योजना राबविण्यात येत आहे. पण तरीही मूल्य संस्काराच्या बाबतीत आपण मागे का? Echo धर्म हा पर्यावरणाच्या बाबतीत मानवाचा नवा धर्म. ह्या धर्माचे पालन आज का होत नाही? मूल्य शिक्षणाच्या माध्यमातून आम्ही काही करू शकू का? सर्वशिक्षा अभियानाप्रमाणेच आपण मूल्यशिक्षा अभियान राबवू शकणार नाही का? ज्याप्रमाणे रोगाचे निदान होऊन उपचार होणे आवश्यक असते त्याचप्रमाणे मूल्यशिक्षणाच्या बाबतीत आपण नैदानिक उपागमाचा वापर करू शकणार नाही का? असे अनेक प्रश्न माझ्या मनाला कायम सतावतात व मला अस्वस्थ बनवितात. माझ्यातील एक अस्वस्थ शिक्षक मग ह्यावर चिंतन करतो व त्यातूनच निर्मिती होते ती शैक्षणिक चिंतनाची. हे शैक्षणिक चिंतन म्हणजे एका अस्वस्थ शिक्षकाचे आत्मचिंतन आहे. ह्या आत्मचिंतनातून गवसले ते शिक्षणाचे अधिष्ठान. विविध शैक्षणिक समस्यांवर उपाय. ज्यांनी हा पाया बळकट केला त्यांच्या प्रति कृतज्ञता. ह्या चिंतनातून ध्यास आहे तो शिक्षणाचा हा रथ बळकट बनविण्याचा. हे चिंतन म्हणजे ज्ञानसागरातील अतिशय सूक्ष्म तुषार आहेत. परंतु जसे लाटेमधील तुषारामधील पाण्याचे तत्त्व हे जीवनदायी व अंतिम सत्य आहे तसेच हे चिंतन वाचकांना निश्चित पण शिक्षणाच्या अंतिम तत्त्वाचा, शिक्षणाच्या अधिष्ठानाचा विचार करायला लावेल अशी मला खात्री आहे.

ह्या चिंतन प्रवासाचे प्रेरक, चिंतनाची दिशा व दृष्टी देणारे, माझे शैक्षणिक मार्गदर्शक डॉ.शशी वंजारी, (विभागप्रमुख पदव्युत्तर शिक्षण विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर), मा.डॉ.राजेंद्र मानेकर (प्राचार्य बी.टी.कॉलेज कोल्हापूर), मा.डॉ.शांताराम गो.बुटे (प्राचार्य शासकीय अध्यापक महाविद्यालय, आकोला) यांची मी शतशः ऋणीआहे.

गेली कित्येक वर्षे अध्यापनाचे कार्य करताना ज्या ज्या विचारांनी मला चिंतन करायला भाग पाडले त्या सगळ्या चिंतन मौक्तिकांना 'भारतीय शिक्षण' ह्या शैक्षणिक चळवळीने प्रकाशझोतात आणले त्याबद्दल मी 'भारतीय शिक्षण'चे संपादक मा.श्री.मधुकरराव पेठे व डॉ.वसुधा कामत यांची ऋणी आहे.

'शैक्षणिक चिंतन' मार्गातील माझे काही चिंतनाचे सहप्रवासी, अर्थात सहलेखक डॉ.शशी वंजारी, मा.डॉ.न.मा.कडू (सहसंचालक, पुणे विभाग), डॉ.सौ.रेखा महाजन, डॉ.रो.वि.तडस, सौ.मंजूषा देशपांडे, कु.मेधा बल्लाळ यांचेही मी ऋण व्यक्त

करते.

माझ्या प्रत्येक शैक्षणिक कार्यात मला सतत प्रोत्साहन देणारे माझे पती श्री.विनोद देव, माझे आई-वडील ॲड.व.ह. जलतारे व सौ.सुहासिनी जलतारे व माझ्या अंतिम ध्येयाची मला सतत जाणीव करुन देणारा माझा छकुला चिन्मय, व माझे सर्व कुटुंबिय सदस्य यांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करते. माझ्या चिंतनाचा पाया ज्यांनी निर्माण केला असे पितृतुल्य स्व.श्री.नानासाहेब लुले व माझे आजोबा स्व.श्री. हनुमंतराव जलतारे यांचे आज स्मरण होऊन मी नतमस्तक होते.

ह्या पुस्तकाला ज्यांची प्रस्तावना लाभली व ज्यांना मी लोकशिक्षक म्हणून आजपर्यंत आदर्श मानत आले असे मराठीचे उपासक, अनेक विद्यार्थ्यांनी ज्यांना अनेकदा 'आदर्श शिक्षक' ह्या अलंकाराने अलंकृत केले ते आदरणीय श्री.राम शेवाळकर यांनी माझ्या लेखनावर आपले भाष्य देऊन एकप्रकारे माझा गौरव वाढविला. मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते. माझ्या चिंतनाला प्रकाशनाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत ज्यांनी पोहोचविले, असे विसा बुक्सचे श्री.विनोद लोकरे यांची मी ऋणी आहे.

माझ्या जीवनकार्याचे अधिष्ठान असणारे सद्गुरू प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती यांच्याच कृपेचे फळ म्हणजे 'शैक्षणिक चिंतन' होय.

॥ हरी ॐ ॥

डॉ.वसुधा वि. देव
अकोला

# पुरस्कार

डॉ.वसुधा देव या अकोल्याच्या शासकीय महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत. अर्थातच शिक्षणक्षेत्र, शिक्षण व्यवस्था, प्रचलित शिक्षणाचे स्वरूप हे त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत. अध्यापनाचेही विषय आहेत. प्रशिक्षण महाविद्यालयात सामान्यपणे विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन व नव्याने उपलब्ध होणाऱ्या पूरक साधनांच्या साह्याने शिक्षण पद्धतीचे स्वरूप काय असावे, आणि त्यासाठी शिक्षकाने पात्रता मिळविण्यासाठी कोणत्या दक्षता घ्याव्यात याबद्दलच्या मार्गदर्शनावर भर असतो. पूर्वसूरींनी व तज्ज्ञ विचारवंतांनी मांडलेल्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करून घेण्याची त्या पद्धतीचीच अपेक्षा असते. पण दुर्दैवाने शिक्षणातील पूर्वसूरींनी व्यक्त केलेल्या विचारांचा उपयोग लेखन व व्याख्याने यासाठीच होतो. त्याचे अनुसरण व कार्यान्वयन करण्याबाबत उदासीनताच असते. परिणामी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, त्यातील विषय छात्रांच्या गळी उतरविण्यासाठी वापरावयाच्या युक्तीबाबतच उद्बोधन केले जाते.

शैक्षणिक तत्त्वज्ञानच नव्हे तर कोणत्याही मूलगामी तत्त्वज्ञानाचे प्राक्तन दुर्दैवाने हेच असते. ते तत्त्वज्ञान माणसाला भारून टाकते. त्याच्या बुद्धीचा कब्जा घेते. पण प्रत्यक्ष आपल्या कार्यक्षेत्राशी समन्वय करण्याचा विचार होत नाही. प्रचलित लोकरीतीनुसार डॉ.सौ. देव यांच्या प्रस्तुत पुस्तकाचेही दोन भाग पडलेले आढळतात. पहिल्या भागात त्यांनी तपस्वी व आचरणशील विचारवंतांचे शिक्षणविषयक चिंतन मांडले असून त्यात स्वामी विवेकानंद, संत ज्ञानेश्वर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वामी चिन्मयानंद आणि डॉ.राधाकृष्णन यांच्या विचारांचा परिचय व परामर्श दिला आहे. भारतीय व अभारतीय शिक्षणदृष्टीमध्ये मूलभूत भेद असा आहे की भारतीय शिक्षणदृष्टीचा भर आंतरिक शिक्षणावर असतो तर अभारतीय शिक्षणाचा बाह्य शिक्षणावर असतो. पंचज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने जगातील ज्या वस्तूंची व विषयांची ओळख होते, त्याचे विश्लेषण व विवेचन रूसोच्या शिक्षण पद्धतीत आहे तर या ज्ञानेंद्रियांच्या मुळाशी असणारे जे प्रेरक मन असते त्यावर संस्कार करण्याचा आग्रह भारताच्या आर्ष शिक्षणदृष्टीत असतो. या द्विविध शिक्षण पद्धतीच्या अंगीकारामुळे बुद्धी आणि मन यांचा संबद्ध नव्हे तर स्वतंत्र विचार केला जातो. पहिल्या प्रकारात बुद्धीचा विकास तर दुसऱ्या प्रकारात भावनांचे संस्करण हे उद्देश असतात. त्यामुळे प्रचलित शिक्षणपद्धती समाजात राहू–केतू तयार करणारी पद्धती ठरते. बुद्धी व भावना यातील संतुलन नीट राखले न गेल्यामुळे बुद्धीवरची सूज वाढत जाते, त्याबरोबरच भावनिक अपंगताही वाढते. त्यामुळे जीवनाबद्दल विचार केला जातो पण आचाराचे आश्वासन मिळत नाही. परिणामी, आचार व विचार यातही सौहार्द राहत नाही. विचारांच्या प्रगल्भतेचा आचारावर परिणाम होत नाही. शिक्षणाने माणसामध्ये द्विजत्व येते. आमूलाग्र परिवर्तन घडून येते. अंतिमत: सामाजिक परिवर्तनालाही ते पूरक ठरते. पण प्रत्यक्षात तसे घडून येत असल्याचे आढळत नाही.

जीवनात परिवर्तन होते पण आचारशैली तीच राहते. किंबहुना, शिक्षणामुळे आचारातील उणिवांचे व अपप्रवृत्तींचे समर्थन करता येण्याचा आत्मविश्वास येतो. म्हणजे बुद्धी कितीही प्रगल्भ झाली, ज्ञान कितीही संपादन करता आले, तरी मनोविकसन अजिबात होऊ शकले नाही. डॉ.देव यांच्या मते – 'शिक्षण म्हणजे सुसंस्कार; शिक्षण म्हणजे वर्तन बदल; शिक्षण म्हणजे संस्कृती संवर्धन, शिक्षण म्हणजे संस्कृती संक्रमण.' शिक्षणाचे फलित त्यांनी योग्य तेच सांगितले आहे. प्रत्येक सुबुद्धाच्या मनात यापेक्षा वेगळे काही असूच शकत नाही. शिक्षणाने निदान वृत्तीचा विकास व्हावा, एक प्रगल्भ जाण उत्पन्न व्हावी, समाजाशी असणाऱ्या आपल्या नात्याचे व प्रतिबद्धतेचे भान यावे अशी प्रांजळ अपेक्षा असणाऱ्या सर्वांनाच व्यक्तित्वावर राष्ट्रीयतेचे किमान संस्कारही न करू शकणाऱ्या बाह्य शिक्षणाचा निरुपायाने पत्कर घ्यावा लागतो.

भारतीय शिक्षणदृष्टी ही आध्यात्मिक असल्याचा उल्लेख डॉ.देव यांनी ग्रंथाच्या पूर्वार्धात पुन्हा पुन्हा केला आहे. भारतीय धारणेनुसार शिक्षण हे कधी बाहेरून लादता येत नाही, आतूनच उमलावे लागते. शिक्षणाचा प्रवास अपूर्ण माणसाला पूर्णत्व देण्याकडे नसून मूलत: पूर्ण म्हणूनच जन्मलेल्या माणसाचे पूर्णत्व प्रगट होण्याकडे व विकसित होण्याकडे असतो. मूल जन्माला येते तेव्हा ते पूर्णच असते. तो सर्व अवस्थांमधून शेवटी वृद्धावस्थेत येतो तोपर्यंत ते पूर्णत्व विकसित झालेले असते. आपल्यातील या पूर्णत्वाची जाण माणसाला नसते. शिक्षणामुळे ती यावी ही अपेक्षा असते. काहींचे पूर्णत्व जन्मत:च प्रगटते म्हणून एखादा शंकराचार्य वयाच्या आठव्या वर्षीच ब्रह्मसूत्रे व उपनिषदांवर भाष्य लिहू शकतो. एखादा ज्ञानेश्वर सोळाव्या वर्षीच ज्ञानेश्वरी लिहू शकतो व एखादे प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज चाळीशीच्या आतच विविध विषयांवरील सव्वाशेपर्यंतची ग्रंथरचना करू शकतात. गायन व वादन यांची बीजेही मुलांमध्ये लहानपणापासूनच असतात.

जी उपजत असते ती उमज, व शिक्षणाने येते ती समज. आपली शिक्षणदृष्टी माणसाची उमज व्यक्त व प्रगल्भ होण्याबद्दल कटाक्ष बाळगते. सर्व अध्यात्म पुरुषांनी शिक्षणाच्या या संकल्पनेकडे व प्रक्रियेकडे लक्ष वेधले आहे. ज्या देशात केवळ तपोबलावर व डोळे मिटूनही सर्व आध्यात्मिक व भौतिक शास्त्रांची निर्मिती करू शकण्याची शक्ती आहे, त्या देशाला केवळ उपजीविकेसाठीच बाह्य शिक्षणाची गरज पडली. हे इंग्रजी विद्येचा परिचय झाल्यानंतरच आपल्याही लक्षात आले. सातासमुद्रापलीकडून आलेल्या सत्ताधाऱ्यांना येथील राज्यकारभार चालविण्यासाठी स्थानिक शिक्षितांची मदत हवी होती, म्हणून आपण त्यांच्या भाषेबरोबरच त्यांच्या शिक्षणदृष्टीचा व पद्धतीचा स्वीकार केला. शिक्षणामुळे माणसे पोटापाण्याला लागू शकतात हे लक्षात आल्यापासून शिक्षणाकडे लोकांची प्रवृत्ती वाढली व त्यातूनच मोठ्या प्रमाणात शिक्षणप्रसार होऊ शकला. आजच्या शिक्षणाला प्रामुख्याने उपजीविकावादी स्वरूप आले ते यामुळेच. उपजीविकेचे शिक्षण आवश्यक आहेच. पण जीविकेबद्दलचे शिक्षण त्याहून आवश्यक आहे. जीविका व उपजीविका हाच भारतीय व अभारतीय शिक्षणहेतूतील फरक आहे.

नव्या शिक्षणाचे लाभही बरेच झाले. विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात विज्ञान, तंत्रज्ञान व संगणक विश्वामध्ये भारताला फार मोठी आघाडी मारता आली. वेगवेगळ्या दिशांनी संशोधनही करता आले. जगाच्या सुखात व समृद्धीत भर टाकता आली याचा मानवाला लौकिक लाभही खूप झाला. नव्या काळातील सर्वसामान्य माणूस हा पूर्वीच्या पेक्षा भौतिक

पातळीवर अधिक सुखी आहे, त्याचे कारण हे शिक्षणच. पण या शिक्षणामुळेच त्याला भौतिक प्रगतीच्या दिशा खुल्या झाल्यात हे खरे असले तरी तो आंतरिकदृष्ट्या फार खंगत गेला आहे. सांस्कृतिकदृष्ट्या तर तो पोखरलेलाच आहे. परिणामी, शारीरिक सुखाच्या मागे लागून आपण स्वतःलाच गमावून बसलो आहोत. भारतीय व अभारतीय शिक्षणाचा व शिक्षणदृष्टीचा सांधा कधीच जुळून आला नाही व येणारही नाही. नव्या माणसाला विज्ञानाचे डोळे व अध्यात्मप्रवण हृदय आवश्यक आहे. अध्यात्माशिवाय विज्ञान अंध वा आसुरी बनते, तर विज्ञानाशिवाय अध्यात्म आत्मकेंद्रित व अपंग बनते. अध्यात्मज्ञान व विज्ञान यांच्या समन्वयाशिवाय मानवाला खऱ्या अर्थाने मुक्ती मिळणार नाही.

**'विज्ञाने कसिले ज्ञान । अशुभातूनि सोडवी'**

असे जे 'गीताई'त म्हटले आहे, ते याच अर्थाने.

हा समन्वय कसा साधणार? त्यासाठी शिक्षण व्यवस्थेमध्ये धार्मिक शिक्षण, नैतिक शिक्षण व मूल्य शिक्षणाचा विचार झाला. पण अभ्यासक्रमात समावेश झाल्यामुळे धर्म, नीती व मूल्य यासारखे महत्त्वाचे विषय केवळ परीक्षेपुरतेच उरतात. बुद्धिमत्ता व स्मरणशक्तीच्या भरवंशावर या तिन्ही विषयांतील प्रश्नांची उत्तरे परीक्षेत नीट देता आली की विद्यार्थी, शिक्षक व पालक या तिघांचेही समाधान होते. त्यामुळे हे विचार आचरणात उतरण्याची गरजच जाणवत नाही. आणि आपल्या धर्माचे लक्षण तर 'आचार प्रभवो धर्मः।' असे आहे. धर्म भाषेतून बोलत नाही, आचरणातून बोलतो. आणि शब्दांपेक्षा आचरणाचे परिणाम अधिक चिरस्थायी असतात.

या पुस्तकातील मूलभूत चिंतनाचा भाग दोन स्वरूपाचा आहे. उरलेल्या भागात अध्यापनविषयक मार्गदर्शन आहे. त्याचा उपयोग शिक्षण क्षेत्रातील होतकरूंना व स्थिरावलेल्यांनासुद्धा होईल. डॉ.सौ. देव यांच्याजवळ शिक्षणाशी संबंधित ज्ञान आहे, चिंतन आहे व तळमळसुद्धा आहे. त्यामुळे शिक्षणाच्या संख्यात्मक विस्तारावर त्यांचे समाधान होणे शक्य नाही. गुणात्मक विकास त्यांना अभिप्रेत आहे. चाणक्याने आपल्या अर्थशास्त्रात शिक्षणाचा व्यापक अर्थ प्रगट करण्यासाठी 'विनय' हा शब्द वापरला आहे. विनय म्हणजे शिक्षणजन्य सत्प्रवृत्ती. केवळ माहिती, केवळ अभ्यास, केवळ ज्ञानाचा साठा यात वाढ होणे निश्चितच कौतुकास्पद आहे. पण समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून शिक्षणाकडे पाहणाऱ्यांना त्यात संतोष नाही. विनय म्हणजे प्रचलित अर्थाने नम्रता. शिक्षणाने खरे म्हणजे माणसामध्ये नम्रता यायला हवी. त्या उलट त्याची अहंताच बळावत जाते. नव्या नव्या ज्ञानातील अमृताच्या थेंबांनी निदान वृत्तीचा विकास होऊ शकला तर शिक्षणाचे, शिक्षणविषयक सर्व धडपडीचे व शिक्षणामागील उद्दिष्टांचे सार्थक होईल.

तसे झाले, तर डॉ.सौ. देव यांच्या परिश्रमांना व तळमळीला कृतकृत्यतेची पालवी फुटेल. तसेच होवो, हीच सदिच्छा!

नागपूर ।
कार्तिक शु.१, शके १९२८

## अनुक्रमणिका


१. संत ज्ञानदेवांची शैक्षणिक विचारधारा १
२. डॉ. राधाकृष्णन – थोर तत्त्वज्ञ ९
३. स्वामी विवेकानंद आणि शिक्षण १५
४. स्वामी चिन्मयानंद : एक अलौकिक व्यक्तिमत्त्व १९
५. संत तुकडोजी महाराज व वैज्ञानिक दृष्टिकोन २३
६. सामाजिक समरसता व संतसाहित्य २८
७. स्वदेशी विचार आणि शिक्षण ३२
८. राष्ट्रनिर्माण आणि शिक्षण ३६
९. 'अध्यात्म' – शिक्षणाचे अधिष्ठान ४१
१०. शालेय स्तरावरील संगणक अध्ययन ४७
११. वैकल्पिक विषय व अभ्यासक्रम ५१
१२. गुणवत्तापूर्ण शिक्षण–प्रशिक्षण ५४
१३. शैक्षणिक संशोधनातील आंतरशाखीय उपागम ७०
१४. उच्च शिक्षण आणि संशोधन ७३
१५. बहुशाखीय अध्यापक शिक्षण ८०
१६. शिक्षक शिक्षणातील नवीन विचार प्रवाह ८६
१७. स्त्रीशक्ती – मातृशक्ती ९०
१८. स्त्री सबलीकरण ९३
१९. मूल्य शिक्षण : सुसंस्कारांचे साधन ९७
२०. मूल्य शिक्षण व नैदानिक उपागम १००
२१. पर्यावरण मूल्य शिक्षण ११०
२२. पर्यावरण मूल्य शिक्षण – सहसंबंधात्मक उपागम ११३
२३. मूल्यशिक्षण अभियान ११६
२४. बाल कामगार – शैक्षणिक समस्या व उपाय १३५
२५. अनिवार्य इंग्रजी १४१
२६. विद्वत संपदा हक्क व मानव संसाधन विकास १४४
२७. आध्यात्मिक अधिकार – श्रेष्ठ मानवाधिकार १४९
२८. मानवाधिकार व बालक शिक्षण १५२
२९. एकविसाव्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने १५८
संदर्भ सूची १६४